जमीन विषयक वाद विवादांच्या अनुषंगाने ***"लिज पेंडन्स"*** ची नोंद अधिकार अभिलेखाच्या गा.न.नं. ७/१२ च्या उताऱ्याच्या इतर हक्क सदरी न घेण्यासंबंधी दिशानिर्देश.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जमीन- २०१७/प्र.क्र.११५/ज-१अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
**दिनांक: २१ सप्टेंबर, २०१७.**

वाचा -

**१)** मा.मुंबई उच्च न्यायालयातील रि.या.क्र. ६६०४/२०१३, आणि रि.या. क्र. ७०४०/२०१३ मधील आदेश दि.२७.२.२०१४ व दिनांक ०७/०६/२०१७

**२)** नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे परिपत्रक क्र.का.४/४५०/१५/लिज पेंडन्स/ १३०२, दि.५.८.२०१५

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदी व त्याखालील महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ नुसार विहीत केलेल्या कार्यवाहीचा अवलंब करुन अधिकार अभिलेखविषयक नोंदी घेण्यात येतात.

०२. अधिकार अभिलेखाच्या गा.न.नं. ७/१२ उता-याच्या नमुन्यातील इतर हक्काच्या रकान्यात "लिज पेंडन्स" ची ही नोंद घेणे अनुषंगिक बाबीची वैधता व अधिकार या अनुषंगाने राज्याचे महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्यात आलेले असून, प्राप्त अभिप्रायांच्या अनुषंगाने याकामी क्षेत्रिय महसूल प्राधिकारी आणि अधिकारी यांना सुस्पष्ट दिशा निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४८ मधील तरतूदी व त्याखालील महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ अन्वये गा.न.नं. ७/१२ च्या उता-यामध्ये कोणकोणत्या बाबींची नोंद असावी, याबाबतचा तपशील विहित करण्यात आला असून, त्यात "लिज पेंडन्स" ची नोंद घेण्याच्या बाबीचा समावेश नाही. त्यामुळे, "लिज पेंडन्स " ची नोंद गा.न.नं.७/१२ उता-याच्या इतर हक्क सदरी घेण्यात येऊ नये.



Scanned with OKEN Scanner

०२. सर्व जिल्हाधिकारी, क्षेत्रीय महसुली प्राधिकारी आणि संबंधित अधिकारी यांनी या निर्देशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१७०९२११२१११८७ ७१९** असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**राजेंद्र क्षीरसागर**
**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

**१)** मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
**२)** मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
**३)** मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
**४)** मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
**५)** मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
**६)** प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांचे वि.का.अ./स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
**७)** प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक, विधानभवन, मुंबई-३२
**८)** सर्व विभागीय आयुक्त,
**९)** जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
**१०)** नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
**११)** सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी,
**१२)** सर्व तहसिलदार
**१३)** महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य,(१)/(२) मुंबई/ नागपूर
**१४)** सर्व उपसचिव/सहसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
**१५)** “ज” समूहातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
**१६)** विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई-३२
**१७)** माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
**१८)** निवडनस्ती, कार्यासन-ज-१, महसूल व वन विभाग

**************



Scanned with OKEN Scanner